ISSN No-2230-7850 Vol.1,Issue.IX/Sept 11pp.1-4

Research Paper

# जात्यावरील ओव्या (इंदापूर तालुका)

प्रा. डॉ महादेव पंढरीनाथ वाळुंज
शिवनेरी',लक्ष्मीमातामंदिराजवळ,
अंबिकानगर, मु.पो,ता. इंदापूर
जि. पुणे 413 106.

. प्रस्तावना –
जातं म्हणजे दळन दळण्याचे साधन. जुन्या काळी खेडेगावात पिठाची गिरणी नव्हती, त्यामुळे स्त्रिया भल्या पहाटे उठून जात्यावर दळन दळण्याचे काम करीत असत. दळणे हे त्यांना आनंदाचे काम वाटत असे कारण ''जाते हे धान्याचे पीठ करून देते, आपल्या घरच्या माणसांना, मजुरांना, पाहुण्यांना, गुराढोरांना आणि देवाच्या नैवद्याला अन्न म्हणजे पीठ पुरविते. जात्याच्या मदतीशिवाय हे कसे शक्य होते?या विचाराने जाते हा एक जीवनदाता, सर्वांना सुखी करणारी एक शक्ती या भावनेने मालन म्हणजे स्त्री त्याला देवता समजते.'' 1 त्यामुळे जात्यावर गाताना ती अतिशय एकरूप झालेली दिसते. ती गीते अतिशय भावसंपन्न आणि सुमधूर असतात. कारण त्यात स्त्रीयांनी आपला आत्मा ओतलेला असतो. याबाबत साने गुरूजी म्हणतात, ''ज्या वाड्.मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला असे वाड्.मय म्हणजे ओवी वाड्.मय''2 अशा प्रकारचे ओवी वाड्.मय इंदापूर तालुक्यात मोठया प्रमाणात मिळते. त्याचे संकलन व अभ्यास करताना जाणवले की, जात्यावरील ओव्या म्हणजे स्त्रीहद्याचा हुंकार आहे.

या जात्याबद्दल आणि जात्यावरील ओव्यांबद्दल कवयित्री बहिणाबाई चौधरी म्हणतात की,

*'अरे, घरोटा घरोटा, माझे दुखता रे हात*
*तसं संसाराचं गानं, माझं बसते मी गात*
*अरे, घरोटा घरोटा, तुझयातून पडे पीठी*
*तसं तसं माझ गानं, पोटातून येतं व्होटी '3*

जात्यावर दळताना आपले हात दुखतात किंवा श्रम होतात ते विसरण्यासाठी आपण गात आहोत. जात फिरल्यामुळे जसं त्यातून पीठ पडत राहत तसं आपलं गाणं पोटातून म्हणजे मनात, काळजात ज्या व्यक्ती, घटना घर करून बसल्यात त्या व्होटी येतात म्हणजे गाण्यातून व्यक्त होतात. लोकगीतातील जात्यावरील ओव्यांचा जन्म अशा प्रकारे झालेला असतो. आपलं दुःख मांडण्याच साधनच जात आणि जात्यावरील ओव्या आहेत असं स्त्रियांना वाटते.

जातं कसं आहे याचे वर्णन एका ओवीत आलं आहे ते म्हणजे–

*'' दगडाचं जातं, चंदनाचा खुंटा*
*जनी दळे पाची बोटा, येईना विठ्ठला*
*दळाण मी दळीते, हात लावून खुंटयाला*
*सारी कळं पाची बोटाला'' 4*

खुंटयाला पाची बोटांनी घट्ट धरून दगडी जात फिरवून आपण दळनं दळत आहोत तेव्हा पाची बोटांना कळ लागते, ताण जाणवतो असे ती सांगते आणि ताण हलका व्हावा म्हणूनच ती उत्स्फूर्तपणे गात असते. जात्यावर बसली की तिला ओवी आपोआप सूचत जाते. पहाटेच्या निरव, शांत वातावरणात जात्याची घरघर सुरू झाली की, जात्याच्या घरघरीच्या एका लयीत, सुरात स्त्रिया ओव्या म्हणत असत. जात्यावर ओव्या म्हणताना आजवर आपल्या हद्यात जे सुख–दुःख साठलेले आहे, ते स्त्रिया ओवीतून व्यक्त करीत असत. जात्यावर ओवी गाताना स्त्रीला आपल्या देवदेवता, आपलं माहेर, माहेरची माणस, गाव, परीसर, सखी, शेजारीण, सासरची माणसं, पती, मुलगा, मुलगी अशा नानाविध बाबींची, मायेच्या माणसांची आठवण येते. त्यामुळे त्यांचेच संदर्भ वा वर्णने जात्यावरील ओवी गीतांमध्ये मिळतात. अशा प्रकारच्या जात्यावरील गीतांचे प्रमाण इंदापूर तालुक्यात मोठया प्रमाणात आहे.

***02जात्यावरील ओव्या –***

माहेर वा माहेरच्या माणसांचे वर्णन करणा–या ओव्या मोठया प्रमाणात मिळतात. कारण माहेर हे कोणत्याही स्त्रीला प्रिय असते. अगदी नवविवाहित स्त्री पासून ते नातू पणतू असलेल्या आजीबाईपर्यंत सर्वांनाच माहेराची ओढ आणि कौतुक असलेले पहावयास मिळाले. माहेराबद्दल बोलताना त्यांच्या सुराला प्रेमाची, मायेची, अपुलकीची किनार दिसली. माहेर आणि माहेरची माणसं स्त्रीने आपलं बालपण तिथे घालवल्यामुळे, एका संस्कारक्षम वयात तिथे मुक्त संचार केल्यामुळे काळजात बसलेली असतात. त्यातही आई विशयी ती अधिकच हळवी बनलेली दिसते. आईच्या उपकारांची आठवण करताना सासुरवाशिण लेक म्हणते–

*'' षेजीचं ऊसनं आल आदुली पायली, मातेच्या ऊसन्याची याद कुणाला राहिली ।*
*षेजीचं ऊसनं माझ्या उंब–यापासून, मातेचं ऊसनं हाय जलमापासून ।*
*षेजीचं ऊसनं मी फेडीते काठोकाठी, मातेचं ऊसनं माझ्या भिडलं हाडोहाडी । 5*

*किंवा ''आईचं उपकार कवा फेडषील जीवा ।*
*हाताचा पाळणा केला नेत्राचा दिवा ।'' 6*

शेजारणीचं ऊसनं आदुली–पायली म्हणजे ग्रामीण भागातील धान्य मोजन्याची माप. आदुली म्हणजे अडीच किलो धान्य बसणारं छान घडवलेले पत्र्याचं माप तर दोन आदुली म्हणजे एक पायली. ते आपण ज्याचं घेतलं त्याचं पुन्हा काठोकाठ माप भरून काळजीने परत करतो पण आईच्या उपकारांची कुणाला आठवण नाही आणि त्याच मोजमाप करता येणार नाही. तिचे ऋण जन्मापासूनच आहे आणि ते आपल्या सर्वस्वात सामावून गेलं आहे, हाताचा पाळणा आणि नेत्राचा दिवा केला तरी ते फेडता न येणारं आहे, याची जाणिव ही स्त्री या ओवीतून व्यक्त करते. तर आईच्या कश्टाळूपणाबद्दल, कामसूपणाबद्दल अभिमानाने म्हणते की,

*''काय काय गं काम, करीन जाता जाता, व्हती वाघीणं माझी माता ।।*
*दळनं कांडणाला, नाही कुणाला हार गेली, जातं वडीती वडीती, जसं हरान पळतं '' 7*

*आपली मुलगीच आपले दुःख जाणून घेऊ षकते. म्हणूनच येथील आई म्हणते–*

*''सुकली, कोम्याली मला कोण म्हणीलं, पोटीची मैना माझी, माझ्या जीवाला जाणील'' 8*

आपलं दुःख फक्त आपल्या मुलीलाच कळू शकते. आपण दुःखी कश्टी आहोत हे ती जाणू शकते आणि तिचं आपल्याला कोमेजली, सुकली का?असं मायेने विचारेल, असा विश्वास आणि मुलीच्या प्रेमाचं वेगळेपण या गीतातून स्त्री व्यक्त करते आहे.

आई–वडीलांइतकीच सासरी जाणा–या स्त्रीला आपला

भाऊ, बहिण यांची आठवण येत असते. त्यांच्या बद्दलचे असंख्य उल्लेख जात्यावरील ओव्यांमध्ये सापडतात. भावा–बहिणीची जन्माची गाठ आहे याचा उल्लेख आणि भावाबद्दलची काळजी व्यक्त झाली आहे. ती म्हणजे–

*'' बहिण भाऊ हयांची पोटामधी माया, फोडील सीताफळ आत साकरीची काया*

*बहिणीला सासुरवास भाऊ पुसितो पाण्यावाट, आसवं गाळीतो मोरावाणी '' 9*

सीताफळाच्या आत असणा–या गोड ग–यांसारखी बहिण–भाऊ यांची प्रीती खोल, काळजातून, आतून असते. बहिणीच्या दुःखाने दुःखी होणारा भाऊ आपल्या हद्यात मानाचं स्थान घेतो. भावाच्या बद्दलचा त्याच्या उदार स्वभावाचे वर्णन पुढील जात्यावरील गीतात आले आहे ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

*''अषी केली बोळवणं, गाईसकट दिलं दावं, नेणत्या बंधवाच गुण घेतं सारं गावं।''10*

ग्रामीण भागात शेतकरी आपलं जनावर विकतो पण त्याच्या सोबत त्याला बांधावयाचे दावे कधीच देत नाही. कारण आपण दाव्यासह जनावर दिले, तर आपली जनावरांची दावण कायमची संपून जाईल. असा श्रद्धेचा मोठा पगडा असताना देखील भाऊ बहिणीला भेट म्हणून गाय देताना तिच्या सोबत तिचे दावेही देतो आहे. कारण त्याची भूमिका आहे की, माइया बहिणीच्या संसारात कशाचीच कमतरता असू नये. दुसरे असे की, जे दयावयाचे ते मनापासून त्यात मन ठेवायचे नाही, अशा निरपेक्ष वृत्तीने भाऊ बहिणीला दाव्यासह गाई देतो म्हणून आपल्या भावाचे संपूर्ण गाव गुणगान गात आहे, असे अतिशय अभिमानाने आणि कौतुकाने ही बहिण सांगते आहे. तर आपल्या भावावरच आपला हक्क असतो इतरांच्या नाही. हा अनुभव ती,

*''लोकाच्या बांधवाला दादा म्हणता पुढं गेला, आपुल्या बांधवाला एका हाकेत उभा केला''11 या जात्यावरील ओवी गीतातून सांगते आहे.*

*सासरच वर्णन करणा–या देखील जात्यावरील भरपूर ओव्या मिळतात.*

*''पहिली माझी ओवी ग, गेले होते माहेरा, आता आले सासरी, ये रे बा विठ्ठला।*

*दुसरी माझी ओवी गं, माझ्या आई–बापानं, चोळी दिली पाठवून, ये रे बा विठ्ठला।*

*तिसरी माझी ओवी ग, चोळीचा हयो रंग, चोळी लेता झाले दंग, ये रे बा विठ्ठला।''12*

आपण आधी माहेरी होतो, आता सासरी आलो आहोत. आपण सासरी आलो असलो तरी, आपल्यावर आपल्या आई–वडीलांची माया पूर्वी सारखीचं आहे. म्हणूनच आपल्यासाठी ते साडी, चोळी मायेने माझ्या सासरी पाठवून देत आहेत. आपला जन्म, संपूर्ण आयुश्य सासरी जावं अशी तिची ओढ आहे. ती म्हणते सासु–सासरे, जावा, दीर, नणंद या सर्वांनी घर भरलेले असल्यामुळेच माझ्या सासरी वावरण्याला शोभा आहे. आणि म्हणून जात्यावर बसल्यावर ती या सर्वांचे गुणगान गाते व एकत्र कुटुंबाची ओढ व्यक्त करते आहे.

*''हवसं मला मोठी, दीरा भायात नांदायाची, माडी कौलारू बांधायाची।'' 13*

एकत्र कुटुंबाची ओढ असणारी ही स्त्री एकत्र कुटुंबाचे महत्त्व सांगताना प्रगती होईल असे सांगते.

महाराष्ट्राच्या एकुण संस्कृतीत भाच्याला म्हणजे नणंदेच्या मुलाला किंवा भावाच्या मुलाला मुलगी देण्याची पध्दत आहे. त्याचा संदर्भ पुढील जात्यावरील ओवी गीतात मिळतो आहे. तो म्हणजे–

*''चीकनं सुपारी जोकं वाण्याची देवई, भाचा केला मी जावाई।*

*चीकनं सुपारी जोकं आणीक, भाचा जावाई खणीकं ''14*

आपला भाचा अतिशय सुंदर आहे म्हणूनच आपण त्याला जावई करून घेतलेला आहे, असे स्त्री सांगते आहे.

पूर्वीच्या काळी कुटुंब नियोजनाची साधन नव्हती आणि तेवढी जागरूकताही नव्हती, त्यातचं मुला–मुलींची लग्न अतिशय लहानपणी होत असतं. त्यामुळे आई आणि मुलगी एकाच वेळी बाळंत होण्याचे प्रसंग खेडयात सर्रास पहावयास मिळत असतं. त्यामुळे अनेक भाच्यांचे वय मामांपेक्षाही जास्त असल्याची उदाहरणे आजही जुन्या पिढीत सहज मिळतात. त्याचाच उल्लेख पुढील ओवी गीतांमधूनओव्यांमधून मिळतो.

*''मामा भाचा, दोघांची षीणं साजं, मामा म्हणाया भाचा लाजं ''15*

म्हणजे मामा–भाच्याचे वय सारखं असल्यामुळे मामाला मामा म्हणण्याची भाच्याला लाज वाटते आहे असे सामाजिक वास्तव अधोरेखित करणारे वर्णन आले आहे

तुकोबांच्या पालखीमार्गावरील हा तालुका आहे आणि पंढरपूर क्षेत्र इथून खूप जवळ असल्यामुळे इथे घराघरात दर एकादशीला वारी करणारे म्हणजे पंढरपूरला जाणारे लोक आहेत. नियमित वारीला जाणा–या वारक–यांचा संकेत/नियम म्हणजे विठ्ठल मंदिरातील गरड खांबाला हात लागला की वारी पोहचली असा आहे. त्याचा उल्लेख– 'देवाच्या देवळात गरड खांबाला माझा हात,

*सावळया विठ्ठलाला वारी पोहचली सांगा आत।'' 16*

अशा प्रकारे आला आहे. स्त्रीला विठ्ठलाचीदेखील काळजी आहे म्हणून ती म्हणते–

*''विटेवरी उभा युगे झाल्याती अठ्ठावीस, सावळया विठ्ठलाला कुणी म्हणना खाली बस।''17*

विठ्ठल रूक्मीण ही ग्रामीण स्त्रीच्या काळजात बसलेली आहेत. म्हणूनच तिला त्यांची काळजी वाटते आहे. आणि त्याचे वर्णन ती आपल्या गीतांमधून वरील प्रमाणे करते आहे.

तुकोबांचे उल्लेख जात्यावरील ओव्यांमध्ये सापडतात. ते पुढीलप्रमाणे–

*''देहूच्या माळावरी कुण्या सांडिला माळबुका, वैकुंठी गेला तुका, माग हालल्या नांदरूका।'' किंवा*

*''साधु म्हण साधु झाल्याती घरोघरी, तुका गेला वैकुंठाला आले का कोणी बरोबरी*

*देहूच्या माळावरी समय जळते धाकटी, तुका गेला वैकुंठाला, जिजा राहिली एकटी।'' 18*

अशा संत तुकोबांच्या चरित्रातील कथा जात्यावरील ओवी गीतात आलेल्या आहेत.

महाराष्ट्रात अनेक घरांमध्ये दररोज हरिपाठाचे पठन, मनन, चिंतन होत असते. त्यामुळे हरिपाठाच्या अभंगांचे खूप महत्त्व आहे. हरिपाठाच्या अभंगांचा आशय आणि गोडवा खेडयापाडयात मुरला आहे. त्यामुळेच त्यांचे उल्लेख स्त्रियांच्या जात्यावरील ओव्यांमध्ये मोठया प्रमाणात सापडतात.

*''रूक्मीणीच्या चोळीवरी अभंग झाले दाट, सावळया विठ्ठलाने वरी काढीले हरिपाठ,*

*रूक्मीणीच्या चोळीवरी अभंगाला नाही जागा, सावळया विठ्ठलाने वरी काढीली चंद्रभागा।*

*रूक्मीणीच्या चोळीवरी अभंग दसोदसी, सावळया विठ्ठलाने वरी काढील्या एकादषी।'' 19*

एकादशीचं वारकरी संप्रदायात खूप महत्त्व आहे. त्या एकादशीचे महत्त्व सांगताना स्त्री म्हणते,

''पंधरा दिवसाची एकादशी, तुम्ही महिन्याची मोडू नका, यमाच्या कचेरीत विठू जामीन होईल सखा,

पंधरा दिसाची एकादशी हायं आपली बहिणबाई, कुणी करीतं कुणी न्हायी।

माझ्या अंगणात तुळशी बाईचं झापाळं, तुळशीच्या सावलीला पोथी वाचितं गोपाळं।

*माझ्या अंगणात तुळशीबाईचा बंगला, राम घिडया यंगला ।''20*

रामायण कथेतील संदर्भ जात्यांवरील ओव्यांमध्ये आलेले आहेत.

*''राम लक्ष्मण दोघं निघाली वनाला, रेषमाचा गोंडा त्यांच्या धनुश्य बाणाला*

*राम चाले वाटं लक्ष्मीण काढी काट, त्रिभुवन धुंडील्याने असा बंधु नाही कुठं । 21*

असे रामायण कथेतील अनेक कथाप्रसंग जात्यावरील ओव्यांमध्ये आलेले पहावयास मिळतात.

तुळस आणि स्त्री यांचे नाते अतुट आहे. अंगणातील तुळशीवृंदावन हे पावित्र्याचे, मांगल्याचे प्रतीक आणि घरातील लोकांचे दैवत आहे. घरातील सर्वांनाच तुळशीबद्दल आत्मभाव असतो. तुळस ही विश्णूची आवडती सखी मानली जाते. आजही महाराश्ट्रात असंख्य घरांसमोर तुळशीवृंदावन असून अनेक बायका आपल्या दिवसाची सुरूवात तुळशीपूजेने करतात. त्यामुळे जुन्या काळातील जात्यावर दळणं दळणारी स्त्री ओव्या म्हणताना तुळशीचा उल्लेख तिच्या ओव्यात सहज आणि उत्स्फूर्त आलेला पहावयास मिळतो. उदा.

*''सकाळच्या पारी सज उगडती दार, दारी तुळस हिरवीगार,*

*सकाळच्या पारी सज उगडते कडी, दारी तुळशीची माडी ।'' किंवा*

*''सरल दळण आता उरलं पाच गहू ,दारी सोन्याची तुळसं, वरी मोत्याची मंजुळा ।22*

जात्यावरील ओवी गीतांमध्ये भौगोलिक परीसराचेही वर्णन आलेले आहे. इंदापूर तालुका निरा–भिमा नद्यांच्या खो–यामध्ये वसलेला आहे. तर निरा–भिमा या नद्यांच्या संगमावर नरसिंगपूर येथे नृसिंहाचे पुरातन मंदिर आहे त्याचेही उल्लेख जात्यावरील ओव्यांमध्ये आलेले पहावयास मिळतात. उदा.

*''निरा बोलती भिवराला का गं ऊषीर केला, यळ लवंगाची झाड तोलनाती मला ।*

*निरा अवखळ तुझ पाणी, स्थिर चालावं माझ्यावाणी, निरा–भिवरा हाय दोघीचा समंगी अवतार*

*नरहारी देव हाय दोघी नारीचा भरतार ।चला सयांनो जावू पाहू, गिरजा नारीचा संसार*

*पाची उतरंडी नाग टाकीतो धुंदकार। नात्यापुत्याच्या बाजारात, संभू देवाला झाली रात*

*गिरजा एकटी डोंगरात, तुला कषाच वाटं भ्याव, खाली बळीच दयावाळ,*

*गिरजा माहयार जवळ. ।''23*

अशा पध्दतीने निरा आणि भिमा नद्यांचा संगम आहे, आणि त्यावर नृसिंहाचे मंदिर आहे. तो निरा, भिमा या दोंघी नारींचा भ्रतार म्हणजे पती आहे. असे सारे वर्णन या गीतात आले आहे. त्याचबरोबर निरा नदीचे पाणी अतिशय वेगाने वाहते तर भिमा नदीचे पाणी संथ वाहते याचाही उल्लेख या गीतात आला आहे.

ज्या गोश्टींची स्त्रियांना आवड आणि ओढ आहे. त्या सगळयांचीच वर्णन जात्यावरील ओवी गीतात आलेली आहेत याचा प्रत्यय आपणास वरील विवेचनातून येतो

### *03 संदर्भ टीपा*

1. बागले प्रभाकर, संपादक, अनुश्टुभ' दिवाळी अंक, 1990, वर्श 14 वे अंक 2 रा व 3 रा, पृ. 44.
2. अहिरे रणजित, कार्यकारी संपादक 'विचारभारती' जुलै 1989, वर्श 18 वे अंक 7 वा, पृ. 28.
3. चौधरी बहिणाबाई, 'बहिणाबाईंची गाणी', सुचित्रा प्रकाशन, मुंबई, बारावी आवृत्ती–2006, पृ. 126.
4. ढवळे द्रौपदाबाई किसन, मौजे मदनवाडी, ता. इंदापूर.
5. खबाले राहिबाई हरिदास, मौजे शहा, ता. इंदापूर
6. जाधव शेवंताबाई, मौजे शेळगाव, ता. इंदापूर.
7. बंडगर रेखा रामदास, मौजे मदनवाडी, इंदापूर.
8. घोगरे उशा रावसाहेब, मौजे सुरवड, ता. इंदापूर
9. मिसाळ शेसाबाई रामचंद्र, मौजे बिजवडी, ता. इंदापूर
10. थोरात भामाबाई काशिनाथ, मौजे उद्धट, ता. इंदापूर.
11. गुंड सुरेखा संभाजी, मौजे सणसर, ता. इंदापूर.
12. आवटे लता रामदास, सावतामाळीनगर, ता. इंदापूर.
13. मोरे कमल विक्रम, मोरे वस्ती, ता. इंदापूर
14. वाघ ऊर्मिला विकास, मौजे तकारारवाडी, ता. इंदापूर.
15. थोरात रंजना भाऊसाहेब, मौजे उद्धट, ता. इंदापूर
16. शिंदे रूक्मीणी केरबा, मौजे गणेशवाडी, ता. इंदापूर
17. खबाले राहिबाई हरिदास, मौजे शहा, ता. इंदापूर.
18. आवटे लता रामदास, सावतामाळीनगर, ता. इंदापूर.
19. सपकळ शकुंतला अभिमन्यु, मौजे नाव्ही, ता. इंदापूर
20. तनपुरे लुपुमुद्रा मोहन, सावतामाळीनगर, इंदापूर
21. घाडगे मंगल शिवाजी, मौजे उद्मायवाडी, ता. इंदापूर
22. थोरात भामाबाई काशिनाथ, मौजे उद्धट, ता. इंदापूर.